नागपूर, रविवार, दि. ५ फेब्रुवारी २०२३

डॉ. अभय बंग : प्रकट मुलाखतीत ओढले शैक्षणिक धोरणावर आसूड

# आजची शिक्षणपद्धती निर्जीव; रेसकोर्सचे घोडे तयार करणारी




ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांची विवेक सावंत, मुक्ता पुणतांबेकर, विनोद शिरसाट यांनी प्रगट मुलाखत घेतली. त्यात डॉ. बंग यांनी शिक्षण, साहित्य यासह विविध बाबींवर मुद्देसुद विचार व्यक्त केले. (छाया : राहुल तेलरांधे)

अभिनय खोपडे
लोकमत न्यूज नेटवर्क

**राष्ट्रपिता महात्मा गांधी साहित्य नगरी, वर्धा** : सध्या शिक्षणपद्धती ही मुलांचे खच्चीकरण करणारी आहे. शिक्षणाच्या बाजारात १५ ते २० कोटी लोकं गुंतलेली आहेत. पालकांनी आपल्या मुलांना रेसकोर्सचे घोडे बनविले आहे. निर्जीव शिक्षण निर्बुद्ध जीवन तयार करणारी सध्याची शिक्षण प्रणाली मुलांचे खच्चीकरण करीत आहे. नयी तालीम शिक्षण प्रणालीतून जीवन शिक्षण, जीवनासाठी शिक्षण देण्याची व्यवस्था होती. आता शिक्षण व्यवस्था हा व्यवसाय झाला आहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात शनिवारी डॉ. अभय बंग यांची विवेक सावंत, मुक्ता पुणतांबेकर, विनोद शिरसाट यांनी प्रगट मुलाखत घेतली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर भूमिका मांडली. ज्ञानोबा, तुकोबा, विनोबा हे तीनशे वर्षांच्या अंतराने निर्माण झालेले आहे. त्यांच्या साहित्यातून समाजाला दिशा मिळाली. विनोबांकडे काल दृष्टी होती. त्यामुळे भविष्याच्या यांच्या साहित्याचं पुर्नलेखन, पुर्नविवेचन करून आळंदी, देहू आणि वर्धा ही साहित्याची पंढरी व्हायला हवी, अशी अपेक्षा डॉ. बंग यांनी व्यक्त केली.

## गैरमराठी महात्मा गांधी यांची मराठी साहित्यात उपेक्षा

देशात स्वातंत्र्याचा एवढा मोठा लढा लढला गेला. महात्मा गांधी या लढ्याचे मुख्य हिरो होते. परंतु मराठी साहित्य व साहित्यकारांनी या लढ्याची सुरुवातीला उपेक्षा केली, अवहेलना केली, नंतर विरोध केला, मराठीत महाकादंबरी यावर निघाली असती. परंतु मराठी साहित्यकारांनी विशेषत: एका विशिष्ट समाजाच्या साहित्यकारांनी यावर साहित्य निर्मिती केली नाही. गांधी व गांधींचा चरखा हा नॉवेलचा हिरो होऊ शकतो. परंतु यावर निर्मिती झाली नाही. गांधी हे गैर मराठी असल्यामुळे हे घडले असावे, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

## विनोबांच्या अनुशासन पर्वावर खळबळजनक खुलासा

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ ला देशात आणीबाणी लागू केली होती. त्यावेळी विनोबा भावे पवनार आश्रमात मौन व्रत धारण करून होते. त्यांना भेटण्यासाठी तत्कालीन काँग्रेस नेते दिवंगत वसंत साठे गेले होते. त्यांनी इंदिराजींनी लागू केलेल्या आणीबाणी पर्वाची माहिती कागदावर विनोबांना लिहून दिली. त्यावर विनोबांनी अनुशासन पर्व यावर प्रश्नचिन्ह टाकले होते. मात्र वसंत साठेंनी नागपुरात जाऊन आणीबाणीला विनोबांनी अनुशासन पर्व म्हटले. आणि ध चा मा केला असा दावा डॉ. बंग यांनी या मुलाखतीत केला.

लोकमत
नागपूर ५/२/२३